# देवकी पंडित यांचे गायन आणि तळवलकरांच्या 'तालयात्रे'चा अनोखा आविष्कार

## थिबा संगीत-कला महोत्सव

**खास प्रतिनिधी, रत्नागिरी**













**रत्नागिरीच्या सांस्कृतिक** क्षेत्राचे अविभाज्य अंग बनलेल्या आर्ट सर्कल आयोजित 'थिबा राजवाडा कला संगीत महोत्सवा'त यंदा सौरभ वर्तक यांचे बासरीवादन आणि प्रसिद्ध गायिका देवकी पंडित यांच्या गायनाबरोबरच ख्यातनाम तबलावादक सुरेश तळवलकर यांच्या कल्पनेतून साकारलेल्या 'तालयात्रे'चा अनोखा आविष्कार रत्नागिरीकर रसिकांना अनुभवायला मिळणार आहे.

येथील थिबा राजवाड्याच्या भव्य पार्श्वभूमीवर दरवर्षीप्रमाणे येत्या २५, २६ आणि २७ जानेवारी हे तीन दिवस संध्याकाळी रंगणाऱ्या या महोत्सवाबद्दल माहिती देताना संस्थेचे अध्यक्ष नितीन कानविंदे यांनी सांगितले की, महोत्सवाचा प्रारंभ जगप्रसिद्ध बासरी वादक पं. हरिप्रसाद चौरसिया यांचा शिष्य सौरभ वर्तक आणि तौफिक कुरेशी यांचे पुत्र आणि उस्ताद झाकीर हुसेन यांचे पुतणे शिखरनाद कुरेशी हे दोन नव्या पिढीतील दमदार कलाकार करणार आहेत. आफ्रिकन तालवाद्य झेंबे आणि अस्सल भारतीय बासरीचा मनोहारी संगम या कार्यक्रमातून रसिकांना अनुभवायला मिळणार आहे. शिखरनाद यांनी अनेक जगप्रसिद्ध गायक आणि वादक कलाकारांना साथसंगत केली आहे. स्वतंत्र कलानिर्मिती करण्याचा वडिलांचा वसा ते पुढे नेत आहेत. तर सौरभ बहुआयामी वादक असून शुद्ध शास्त्रीय वादनाबरोबरच सतार, सरोद, व्हायोलिन, आणि गायन यांना सहवादनदेखील करतात. त्यांचा स्वतःचा फ्यूजन बँड असून त्यांनी उस्ताद शाकिर खान आणि शौनक अभिषेकी यांच्यासारख्या आंतरराष्ट्रीय कलाकारांच्या सोबत काम केले आहे. प्रसिद्ध गायिका विदुषी देवकी पंडित यांचे गायन या संध्याकाळी उत्तरार्धात होणार आहे. गेली काही दशके संगीताच्या क्षेत्रात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केलेल्या देवकी पंडितांनी गानसरस्वती किशोरी आमोणकर आणि पंडित जितेंद्र अभिषेकी यांच्यासारख्या गुरूंच्या मार्गदर्शनाखाली संगीताची उपासना केली आहे. त्यांच्या शास्त्रीय गायनाने महोत्सवाचा पहिला दिवस संपन्न होईल. आसमंत बेनेव्हलन्स यांनी महोत्सवाचा प्रारंभीचा दिवस प्रायोजित केला असून हे दोन्ही कार्यक्रम सर्वांसाठी खुले आहेत.

महोत्सवात दुसऱ्या दिवशी, २६ जानेवारी रोजी सायंकाळी भारतीय शास्त्रीय संगीतामधील 'तालयात्रा' या अनोख्या कार्यक्रमाचा आस्वाद रसिकांना घेता येणार आहे. जगप्रसिद्ध तबलावादक आणि गुरू तालयोगी पंडित सुरेश तळवलकर यांच्या प्रतिभेतून साकार झालेल्या या कार्यक्रमात विविध भारतीय आणि पाश्चिमात्य वाद्य गायन आणि कथ्थक यांचा सुरेख मिलाफ आहे. यात गुरू पंडित तळवलकरांसोबत सावनी तळवलकर आणि आशय कुलकर्णी तबला साथीला, ओंकार दळवी आणि कृष्णा साळुंखे पखवाज साथीला, अभिषेक भुरुक ड्रम, उमेश वारभुवन झेंबे, ईशान परांजपे केजोन साथीला, अभिषेक शिनकर संवादिनी साथीला असणार आहेत. तर नागेश आडगावकर, विनय रामदासन हे गायक कलाकार आहेत. अमृता गोगटे, ईशा फडके, आणि आयूषी दीक्षित या कथ्थक नृत्य कलाकार आहेत. या संपूर्ण कार्यक्रमाला अनय गाडगीळ कीबोर्ड साथ करणार आहेत. महोत्सवाच्या अखेरच्या दिवसाची (२७ जानेवारी) सुरुवात रमाकांत गायकवाड आणि आदित्य मोडक या दोन नव्या दमाच्या गायकांच्या सहगायनाने होणार आहे. आई-वडिलांकडून संगीताची परंपरा लाभलेल्या रमाकांत यांनी किराणा आणि पटियाला घराण्याच्या अंगाने वयाच्या सहाव्या वर्षापासून गायन सुरू केले आहे. तर आदित्य मोडक यांनी वयाच्या पाचव्या वर्षापासून चंद्रकांत पारकर यांच्याकडून गायनाचे धडे घ्यायला सुरुवात केली. त्यानंतर प्रदीप धोंड आणि आता गायक डॉ. राम देशपांडे यांचं शिष्यत्व त्यांनी पत्करलं आहे. या दोघांनीही भारतभरातील विविध मानाच्या महोत्सवामधून सादरीकरण केलं आहे.

सुप्रसिद्ध व्हायोलिनवादक विदुषी कला रामनाथ यांच्या वादनाने या महोत्सवाची सांगता होणार आहे. मेवाती घराण्याच्या शिष्या असलेल्या कला रामनाथ यांनी पंडित जसराज यांच्याकडून चौदा वर्षे संगीताचे शिक्षण घेतले आहे. लयीवरची पकड, स्वरांमधली स्पष्टता, आणि आशयगर्भता ही त्यांच्या वादनाची खास वैशिष्ट्ये आहेत. सुप्रसिद्ध वादक पं. शुभंकर बॅनर्जी त्यांना तबल्यावर साथ करणार आहेत.

या वार्षिक महोत्सवाबरोबरच पुढील महिन्यात ११ फेब्रुवारी रोजी आर्ट सर्कल तपपूर्ती सोहळा साजरा करत आहे.

यापूर्वीचा दशकपूर्ती सोहळा उस्ताद झाकीर हुसेन यांच्या तबला वादनाने अविस्मरणीय ठरला होता. आता तपपूर्ती सोहळादेखील तशाच ताकदीच्या कलाकाराने रंगतदार होणार असल्याचे कानविंदे यांनी नमूद केले.